## अपुऱ्या गाड्या, बसमार्ग बंद, प्रवाशांची पायपीट

# दक्षिण मुंबईत 'बेस्ट' सेवा कोलमडली

## दहा दिवसांत सुधारणा करा अन्यथा शिवसेनेचे आंदोलन

मुंबई, दि. १६ (प्रतिनिधी) – नेहमीच गजबजलेल्या असणाऱ्या दक्षिण मुंबईतून सुटणाऱ्या गाड्यांची संख्या अपुरी असून कोरोना काळात बंद केलेल्या फेऱ्या अजूनही सुरू झालेल्या नाहीत. शिवाय काही मार्गांवर एकमार्गी सेवा सुरू असल्याने प्रवाशांना पायपीट करावी लागते. त्यामुळे या भागातील रहिवाशांसह प्रवासी–नोकरदारांचे प्रचंड हाल होत आहेत. त्यामुळे दक्षिण मुंबईत कोलमडलेली 'बेस्ट' बस सेवा दहा दिवसांत सुधारा, अन्यथा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) स्टाईल जोरदार आंदोलन करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. याबाबत विभागप्रमुख संतोष शिंदे यांनी 'बेस्ट' महाव्यवस्थापक लोकेश चंद्र यांना निवेदन दिले आहे.

दक्षिण मुंबईत मेट्रो–३ चे भूमिगत काम सुरू असल्याने सध्या फक्त एकाच दिशेने मेट्रो सिनेमा ते गिरगाव चर्च अशी वाहतूक सुरू आहे. यामुळे प्रवाशांना बस पकडण्याकरिता महर्षी कर्वे मार्गावरील बस स्टॉपपर्यंत पायपीट करावी लागते. शिवाय गेल्या काही महिन्यांपासून या विभागातून चालणाऱ्या बसमार्ग क्र. ६६, ६९, १२६, ८८ या मार्गांवर चालणाऱ्या बसगाड्यांमध्ये



कपात करण्यात आलेली आहे. त्यामुळे प्रवासी, महिला, विद्यार्थी व ज्येष्ठ नागरिकांना 'बेस्ट' बस पकडण्यासाठी ताटकळत उभे रहावे लागते. तसेच कोरोना काळात बंद करण्यात आलेले बसमार्ग क्र. ६१, १३२ व १३३ अजूनही बंद असल्यामुळे प्रवाशांना ताडदेव, महालक्ष्मी परिसरात जाण्यास त्रास होत आहे. त्यामुळे याबाबत तातडीने कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली आहे. यावेळी विभागसंघटक युगंधरा साळेकर, विधानसभा संघटक राजू फोडकर, गणेश सानप, करुणा गिध, सुरेखा उबाळे, उपविभागप्रमुख कृष्णा पोवळे, शिवाजी रहाणे, सुनील कदम, संतोष वीर, गजानन भोसले, किरण बाळसराफ यांच्यासह शिवसैनिक उपस्थित होते.